# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पालघर जिल्ह्यातील आदिवासी विभागातील मुलांना उच्च शिक्षणाच्या सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) ६९८८ (०९-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी विभागातील मुलांना उच्च शिक्षणाच्या सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासंदर्भात विद्यापीठ स्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर आदिवासी विभागातील मुलांना उच्च शिक्षणाच्या सुविधा वेळेत उपलब्ध करुन देण्याकरिता आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१५) :** (१), (२) व (३) नाही. राज्यात ब-याच प्रमाणात महाविद्यालयात जागा रिकाम्या राहतात. त्यामुळे राज्यात विद्यापिठामार्फत करण्यात येणा-या बृहत आराखडा करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक असल्याने यावर्षी नविन महाविद्यालयांनी मान्यता न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

**अमेरिका व युरोप मधील काही देशांमध्ये बंदी घातलेल्या औषधांचा वापर मुंबईसह राज्यात अंमलीपदार्थांसाठी होत असल्याबाबत**

**(२) ८०७२ (०६-०४-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमेरिका व युरोप मधील काही देशांमध्ये बंदी घातलेल्या औषधांचा वापर मुंबईसह राज्यातील अनेक शाळकरी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अंमलीपदार्थांसाठी होत असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर औषधे कोणत्या कंपनीची आहेत, त्यांच्यावर कायमस्वरुपी बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर औषधांची विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

असे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोताळा (जि. बुलडाणा) परिसरातील विट भट्टीच्या अल्प उद्योगास परवाना देणे बाबत**

**(३) ९७७५ (१०-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि. बुलडाणा) परिसरातील विट भट्टीच्या अल्प उद्योगास परवाना मिळणे बाबत उपविभागीय अधिकारी (महसूल) मलकापुर यांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मोताळा (जि.बुलडाणा) परिसरातील विट भट्टीच्या अल्प उद्योगास परवाना देणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मिरा भाईंदर (जि.ठाणे) येथील ग्रामीण भागात**
**पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाल्याबाबत**

**(४) १७५६८ (२९-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईदर (जि.ठाणे) येथील ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाल्याने खोल विहिरीतील पाणी काढण्यासाठी नागरिकांना प्रामुख्याने महिलांना जीवाचा आटापिटा करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
मिरा भाईंदर शहरातील रहिवाशांना ४५ ते ४८ तासातून १ वेळेस पाणी पुरवठा सुरु आहे. मिरा भाईदर शहरात ज्या ठिकाणी रस्ते उपलब्ध नाही अशा व झोपडपट्टी, आदिवासी पट्टयात महानगरपालिकेमार्फत सिंटेक्सच्या पाण्याच्या टाक्या बसवून त्यामध्ये महानगरपालिकेमार्फत टँकरद्वारा पिण्याचे पाण्याचा पुरवठा केला जात आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत ८० कूपनलिका कार्यरत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत असुरक्षित आणि निकृष्ट अन्नामुळे होणाऱ्या आजारांमुळे**
**दररोज ५० बालकांचा बळी जात असल्याबाबत**

**(५) १७८५३ (१४-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत असुरक्षित आणि निकृष्ट अन्नामुळे होणाऱ्या आजारांमुळे दररोज ५० बालकांचा बळी जात असल्याचे एका सर्वेक्षणातून माहे एप्रिल, २०१५ दरम्यान पुढे आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
अशा प्रकाराची घटना निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**विळे भागाड (ता.महाड, जि.रायगड) औद्योगिक वसाहती मधील पॉस्को महाराष्ट्र स्टील कारखान्याचे दूषित सांडपाणी काळ नदीत सोडले जात असल्याबाबत**

**(६) १८३७७ (३१-०७-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निजामपूर (ता.महाड, जि.रायगड) विभागातील विळे भागाड औद्योगिक वसाहती मधील पॉस्को महाराष्ट्र स्टील कारखान्याचे दूषित सांडपाणी काळ नदीत सोडले जात असल्याने नदीकाठच्या नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार संबंधित कारखान्यावर कोणती कारवाई केली व काळ नदी प्रदुषित होवू नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०४-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीअंती सदर उद्योगातील प्रक्रियाकृत सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर केला जात असल्याचे आढळले, उद्योगामार्फत परिसरात सांडपाणी कोठेही उघड्यावर वा नदीपात्रात सोडल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**माहुल खाडीत प्रदुषण करणा-या कंपन्यावर कारवाई करणेबाबत**

**(७) १९६३० (३१-०७-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ''माहुल खाडीत प्रदुषण करणा-या कंपन्यावर कारवाई करणेबाबत'' या विषयावरील दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी, अणुशक्तीनगर यांनी मा.मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०४-०३-२०१६) :** (१) प्रस्तुत प्रकरणी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजीचे निवेदन पाप्त झाले आहे.
(२) प्रस्तुत निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २०.०२.२०१५ रोजी मे.एजिस लॉजिस्टिक लि.आणि मे.सिलॉर्ड कंटेनर्स लि. या कंपन्यांना भेट देऊन पाहणी करण्यात आली. सदर पाहणी दरम्यान दोन्ही कंपन्यांमधून सांडपाणी कंपनीच्या आवाराबाहेर सोडत असल्याचे आढळून आले नाही. मे.एजिस लॉजिस्टिक लि.या कंपनीमध्ये निर्माण होणा-या औद्योगिक सांडपाण्यावर मे.सिलॉर्ड कंटेनर्स लि. येथे उभारलेल्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेमध्ये प्रक्रिया केली जाते व प्रकियाकृत सांडपाण्याचा वापर बागबगीचा इ. कारणासाठी केला जातो.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेर (ता.जि.उस्मानाबाद) येथे सुसज्ज पुराणवस्तु संग्रहालय बांधण्याबाबत

**(८) २८१८९ (१५-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेर (ता.जि.उस्मानाबाद) येथे गत वर्षीपासून पुरातत्व विभागाच्या वतीने उत्खननाला सुरुवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेर या गावी संत गोरोबा काकांचे समाधी मंदिर, तसेच बौध्द जैन, हिंदू इत्यादी धर्माच्या अनेक पुरातन वास्तू आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्खननात अद्यापपर्यंत किती वस्तू सापडल्या आहेत, त्या ठेवण्यासाठी तेथे असलेले जुने पुराणवस्तू संग्रहालय अपुरे पडते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर धार्मिक, ऐतिहासिक वारसा असलेल्या गावास सुसज्ज असे मोठे पुराणवस्तू संग्रहालय बांधण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय तसेच सदर प्रस्ताव शासनास सादर करुन कधीपर्यंत मंजूर होईल,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) होय, नवीन इमारत उभारण्याकरीता अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी चित्रपट निर्मात्यांना अनुदान देण्यासाठी होणारा विलंब

**(९) २८४१२ (२१-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी चित्रपट सृष्टीचा विकास व्हावा, मराठी चित्रपट उद्योगाला प्रोत्साहन मिळावे, यासाठी ए व बी दर्जा असणाऱ्या चित्रपटांना अनुक्रमे ४० व ३० लाख रुपये देण्यात येणारे अनुदान पात्र ठरलेल्या चित्रपटांना मिळावे यासाठी चित्रपट निर्माते व दिग्दर्शकांना गत ८ महिन्यांपासून मागणी करीत असून अद्यापही त्यांना अनुदान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच मराठी चित्रपट कलाकारांना सांस्कृतिक मंत्रालयाकडून आर्थिक मदत मिळूवन देण्यास स्थानिक लोकप्रतिनिधी, नेवासा यांनी प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अनुदान देण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अनुदान देण्यास आठ महिन्याचा विलंब लागण्याची कारणे काय आहेत व सदर अनुदान तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.

विभागाच्या प्रचलित योजनेनुसार अ व ब दर्जा प्राप्त एकूण ६ चित्रपटांना दि.१६.१०.२०१५ रोजी रु. २१४ लक्ष एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच विभागाच्या दि. ११.१२.२०१५ व दि.१२.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये एकूण रु. ३४० लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(२) मराठी चित्रपट कलाकारांना आर्थिक मदत मिळवून देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी, नेवासा यांनी विभागाकडे मागणी/पत्र व्यवहार केल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) योजनेनुसार आवश्यक विहीत नमुन्यातील अर्ज, सोबत सादर करावयाची कागदपत्रे यांची पूर्तता करण्यास काही वेळ चित्रपट निर्मात्यांकडून विलंब होतो. तथापि, परिपूर्ण प्रस्ताव महामंडळाकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर विनाविलंब कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे शासनस्तरावरुन अर्थसहाय्य देण्यास विलंब होतो हे म्हणणे वस्तुस्थितीस धरुन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेसाठी असलेले एल.पी.जी. अनुदान बंद करण्यात आल्याबाबत**

**(१०) २८४१४ (२१-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये विद्यार्थ्यांसाठीच्या मध्यान्ह भोजन योजनासाठी दिले जाणारे एल.पी.जी. अनुदान रद्द करण्याचा निर्णय केंद्र शासनाने, माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्यामुळे, राज्य शासनास बाजार भावानुसारच एल.पी.जी. गॅस घ्यावा लागणार असल्याने, राज्य शासनाच्या तिजोरीवर आर्थिक भार पडणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदान पूर्ववत सुरु करण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, एल.पी.जी. गॅसचे अनुदान रद्द केल्यामुळे पडणाऱ्या अतिरिक्त भारासाठी कोणती तरतूद केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१६) :** (१) केंद्र शासनाच्या दिनांक ०५/०७/२०१३ व दि. ०२/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अनुदानित १२ गॅस सिलेंडर हे केंद्र शासनाने ठरविलेल्या मर्यादेपर्यंतच देण्यात येतात व या मर्यादेच्या वरील सिलेंडर हे खुल्या दराने घेणे आवश्यक आहे,

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावरगांव (ता. निफाड,जि.नाशिक) येथे पाण्याची टाकी पडून २ व्यक्तींचा मृत्यू झाल्याबाबत**

**(११) २८४९० (२९-१२-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगांव (ता. निफाड,जि.नाशिक) येथे पाण्याची टाकी पडून २ व्यक्तींचा दिनांक ११ ऑक्टोबर ,२०१५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर ग्रामपंचायतीला पाणी पुरवठ्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या पुढाकाराने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक यांनी दिलेला निधी ग्रामपंचायतीने परत पाठविला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, देखभाल व दुरुस्ती योजनेंतर्गत सावरगाव गावास २१.३३ लक्ष रुपये किंमतीची योजना गावाच्या मागणीनुसार मंजूर करण्यात आलेली होती. सदर अंदाजपत्रकात पंप व उर्ध्व वाहिनी या २ उपांगाचा समावेश होता. परंतु शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीने आवश्यक ती कार्यवाही न केल्यामुळे व निधी मागणी प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर केलेला नसल्याने सदर ग्रामपंचायतीस निधी वर्ग करण्यात आलेला नाही.
(३) सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक यांचे दि. २९.१०.२०१५ चे आदेशान्वये संबंधित ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर व पेण (जि. रायगड) तालुक्यातील गावांच्या शेतजमिनीतून इथेन गॅस वायूची पाईप लाईन नागोठणे येथे जात असल्याने जमिनी नापिक होत असल्याबाबत**

**(१२) २८७०५ (२१-१२-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड (ता.खालापूर) जिल्ह्यातील धारणी, माजगांव, आंबिवली, पौध,माडप, खरसुंडी, असरा तसेच पेण तालुक्यातील काही गावाच्या शेतजमिनीतून इथेन गॅस वायूची पाईप लाइन दहेजवरुन नागोठणे (जि.रायगड) पर्यन्त जात असल्याने उक्त ठिकाणच्या शेतक-यांच्या जमिनी नापिक होण्याच्या संभव असल्याने सदर शेतकऱ्यांनी याप्रकरणी विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात तेथील शेतक-यांनी संबधित अधिका-यांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) व (२) होय.
सदर प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जनसुनावणी दि. ०४.०४.२०१५ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी काही ग्रामपंचायती व शेतकरी यांनी लेखी तक्रारी दिल्या आहेत.
(३) सदर तक्रारीची दखल घेऊन त्याच्या नोंदी जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये घेतल्या असून सदर इतिवृत्त व सर्व संबंधित कागदपत्रे पर्यावरण, वन व हवामान मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरघोट (ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील जनावरांच्या चरबीवर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यातून होणारे प्रदूषण**

**(१३) २८९३७ (२१-१२-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरघोट (ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील जनावरांच्या चरबीवर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्याचे मांस व रक्त असलेले दुर्गंधीयुक्त पाणी कोणतीही प्रक्रिया न करता सरळ ओढ्यात सोडून दिले जाते, सदर पाणी ओढ्यातून थेट भीमा नदीत मिसळते, सदर पाण्यामुळे जलचर प्राणी मृत्युमुखी पडले असून इतर जनावरे तसेच माणसांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त व प्रदूषण नियंत्रक महामंडळाने आदेश देऊनही सदरील कारखाना बंद झाला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित कारखाना बंद करण्यासाठी तसेच पाणी दुषित केल्याबद्दल कारखाना मालकावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०४-०३-२०१६) :** (१) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचेसमवेत दिनांक १९.०९.२०१५ रोजी केलेल्या पाहणीत मे. सना इंटरप्रायजेस या कारखान्याचे औद्योगिक सांडपाणी प्रक्रियाविना पावसाच्या पाण्याबरोबर शेजारच्या नाल्यात जात असल्याचे आढळून आले.

तथापि, भीमा नदी काठावरील कोणत्याही गावांमध्ये जलजन्य आजारांचा उद्रेक झालेला नसून रुग्ण संख्येत वाढ झाली नसल्याचे व कुरघोट परिसरात दूषित पाणी प्यायल्याने रोग प्रादुर्भाव होऊन जनावरे मृत वा आजारी पडल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर उद्योगास स्वेच्छेने उत्पादन बंद करण्याचे आदेश दिनांक २१/०९/२०१५ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत पारित करण्यात आल्यानंतर दिनांक ०९/१२/२०१५ रोजी सदर उद्योग बंद करण्याचे अंतिम आदेश पारित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी-निजामपूर महापालिका क्षेत्राशी सलंग्न असलेल्या आसपासच्या ग्रामीण व निमग्रामीण क्षेत्रात होत असलेले जल-वायू प्रदूषण रोखण्याबाबत**

**(१४) २९१४२ (२१-१२-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महापालिका क्षेत्राशी सलंग्न असलेल्या आसपासच्या ग्रामीण व निमग्रामीण क्षेत्रात मोठया प्रमाणावर होत असलेले जल-वायू प्रदूषण रोखण्याबाबतची मागणी

स्थानिक लोकप्रतिनिधी, रहिवाशी नागरिक-ग्रामस्थ यांनी माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा. पर्यावरण मंत्री, मा. पर्यावरण राज्यमंत्री, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी ठाणे ग्रामीण तसेच संबंधित ठिकाणच्या अनुक्रमे महानगरपालिका आणि जिल्हा ग्रामीण पर्यावरण संरक्षण समितीकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, उपमहापौर, भिवंडी महानगरपालिका यांचे दि. २२/ ०७/२०१५ रोजी "भिवंडी शहरालगत वाहणाऱ्या कामवारी नदीपात्रात व हरित पट्ट्यात झालेल्या अनधिकृत बांधकामामुळे व नदीपात्रात भराव टाकल्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा न झाल्याने पाणी शहरात घुसुन नागरिकांच्या होत असलेल्या नुकसानाबाबत" या विषयी पर्यावरण विभागास निवेदन प्राप्त झाले होते. या प्रकरणी पर्यावरण विभाग, मंत्रालय यांच्याकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांना योग्य ती चौकशी करुन उचित कार्यवाही करण्याबाबत १) तक्रार २०१५/सं.क्र.१२७४/तां.क. १ दि. ३०/०७/२०१५, संकीर्ण २०१५/सं.क्र.६१/तां.क्र.१ दि.०८/१२/२०१५ व संदर्भ-२०१५/सं.क्र.१२७४/तां.क्र.१ दि.०२/०२/२०१६ रोजी पत्र निर्गमित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे उद्भवणारी पाणी टंचाई लक्षात घेवून योग्य नियोजन होणेबाबत

**(१५) २९२११ (२१-१२-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील अल्प पर्जन्यमान व दुष्काळी परिस्थितीमुळे प्रत्येक वर्षी उद्भवणारी पाणी टंचाई लक्षात घेवून जिल्ह्यातील सर्व गावांचा कृती आराखडा तयार करून पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन होणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, गत वर्षी पडलेला सरासरी पाऊस व आजतागायत पडलेल्या पावसाची आकडेवारी पाहता माहे जानेवारी, २०१६ पर्यंत जिल्ह्यातील पिण्याची पाण्याची स्थिती काय असेल,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणते नियोजन वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२३-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत उस्मानाबाद जिल्हयामध्ये दि. ४/०१/२०१६ च्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार १२२ गावे व ४ वाड्यांना १६८ टँकरद्वारे व ४२५ गावांना ८५६ विहीर/विंधन विहिर अधिग्रहणद्वारे पाणी पुरवठा होत आहे तसेच परांडा नगरपरिषद क्षेत्रात १० टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(३) जानेवारी, २०१६ पर्यंत जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची तीव्रता अधिक जाणवणार आहे. मात्र त्यावर टंचाई अंतर्गत विविध उपाययोजनाद्वारे मात करण्याचे नियोजन केलेले आहे.
(४) ऑक्टोबर २०१५ ते डिसेंबर २०१५, जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ व एप्रिल २०१६ ते जून २०१६ पर्यंतचे पाणी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले असून ५६८९ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील गोसेखुर्द धरणात नाग नदीच्या दुषित पाण्यासह**
**इकॉर्निया वनस्पतीमुळे प्रदुषण होत असल्याबाबत**

**(१६) २९२९६ (२१-१२-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील गोसेखुर्द धरणात नाग नदीच्या दुषित पाण्यासह इकॉर्निया वनस्पतीमुळे प्रदुषण होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुषित पाण्यामुळे नागरिक व जनावरांच्याही आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाग नदीच्या पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) NWMP/SWMP या केंद्र शासनातर्फे पुरस्कृत योजनेतंर्गत वेगवेगळ्या नद्यांच्या पाण्याचे नमुने नियमितपणे संकलीत करण्यात येतात. गेल्या वर्षभरातील नमुन्यांच्या पृथःकरण अहवालावरुन असे दिसून येते की, नाग नदीच्या पाण्याची गुणवत्ता खालावलेली आहे. राष्ट्रीय नदी कृती योजनेअंतर्गत नागपूर शहराचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला असून प्रस्ताव प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे तालुक्यातील अवधान, नेर, मोराणे या गावाच्या पाणीपुरवठा योजनांना शासनाने स्थगिती दिल्याबाबत

**(१७) २९३६८ (२१-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), अ‍ॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवधान, नेर, मोराणे (ता.जि.धुळे) या गावांच्या पाणीपुरवठा योजनेला शासनाने स्थगिती दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील पाणी पुरवठा योजनेवरील स्थगिती मागे घेऊन सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :** (१) व (२) केंद्र शासनाचे निर्देशास अनुसरुन शासनाच्या दि. १४.५.२०१५ चे पत्रान्वये सन २०१५-१६ चे कृती आराखडयात समाविष्ट असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे सुरु करण्यास वा हाती घेण्यास स्थगिती देण्यात आली आहे. केंद्र शासनाचे पुढील आदेशानुसार यात बदल होवू शकतो. मात्र सद्यस्थितीत केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### श्रीरामपूर (जि. अहमदनगर) येथे होत असलेला रॉकेलचा अपुरा पुरवठा

**(१८) २९७७८ (२१-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (ता. जि. अहमदनगर) येथे केवळ १ लाख ३२ लिटर इतके कमी रॉकेल येत असल्याने रॉकेल विक्री करताना पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यासाठी ४२ टँकरची आवश्यकता असताना केवळ ११ टँकरच येत असल्याने रॉकेल विक्रेत्यांना शासनाने ठरवून दिलेल्या माणसी संख्येप्रमाणे रॉकेल देता येत नसल्याने नागरिकांचा रोष ओढवुन घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी रॉकेलचा पुरेसा पुरवठा करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दि. २० ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या परिमाणानुसार श्रीरामपूर तालुक्याच्या मागणीच्या १०० टक्के इतके केरोसिन सदर तालुक्यास मंजूर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरूळ (जि.ठाणे) येथील विशाल ऑरगनिक्स कंपनीच्या गोदामातून विनापरवाना औषधे व सौंदर्य प्रसाधनाचा साठा जप्त केल्याबाबत**

**(१९) ३००३२ (२१-१२-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरूळ (जि.ठाणे) येथील विशाल ऑरगॅनिक्स कंपनीच्या गोदामात अन्न व औषधे प्रशासनाने टाकलेल्या धाडीत सुमारे ३० लाख रूपयांचा विना परवाना औषधे व सौंदर्य प्रसाधनाचा साठा जप्त केल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनीवर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०३-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे. विशाल ऑरगॅनिक्स गाळा नं. ७, हॅबीटेट सीएचएस, प्लॉट नं. अे ४६/४७ सेक्टर, २३, नवी मुंबई येथे दिनांक २२/८/२०१५ रोजी अन्न व औषध प्रशासनाने धाड टाकून केलेल्या तपासणी/चौकशी दरम्यान सदर जागेत आयुर्वेदिक औषधे व सौंदर्य प्रसाधने विना परवाना उत्पादित करत असल्याचे आढळले, तसेच सदर उत्पादनाची पडताळणी केली असता, सर्व आयुर्वेदिक औषधे व सौंदर्य प्रसाधने ही बनावट व मिथ्या छाप असल्याचे आढळून आले. तपासणीदरम्यान ०३ आयुर्वेदिक व ०५ सौंदर्यप्रसाधने असे एकूण ०८ नमुने चाचणी व विश्लेषणासाठी घेण्यात आले असून उर्वरित सौंदर्य प्रसाधने व आयुर्वेदिक औषधींचा साठा तसेच पॅकींग मटेरियल व मशीन्स, साहित्य पंचनाम्याअंतर्गत जप्त करण्यात आलेला आहे.

तथापि, सदर प्रकरणी ३० लाख रुपयांचा विनापरवाना औषधे व सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केला नसून सुमारे १० लाख ५० हजार रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला. त्यामध्ये रु. १ लाख ७३ हजार या किंमतीचा आयुर्वेदिक औषधांचा व सौंदर्य प्रसाधनांचा समावेश आहे.

(२) सौंदर्य प्रसाधनाप्रकरणी कलम १८(c), १८(a)(ii), १८(b), R/w.१७-c, १७-D व आयुर्वेदिक औषधांप्रकरणी कलम ३३-EEC (a)(i), ३३-EEC(b),३३-EEC(e), R/w.३३-EA P/u section २७-A (i)(ii), ३३-I(१)(a)(i)(iii), ३३-I(I)(b) अंतर्गत गुन्हा नोंदवून खटला दाखल करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील गॅस वितरकांकडून गॅस ग्राहकांची तीन वर्षापासून होत असलेली फसवणूक

**(२०) ३००६९ (२१-१२-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील सुमारे २७००० गॅस ग्राहकांची संगमनेरचे गॅस वितरक गत ३ वर्षापासून फसवणूक करीत असून त्यांनी ग्राहकांची २५ कोटी रुपयांची लूट केल्याची माहिती दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गॅस ग्राहकांची लूट करणाऱ्या संबंधित गॅस वितरक यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१६) :** (१) दिनांक १२/०८/२०१५ रोजी अकोले तालुक्यात शासनाने ठरवून दिलेल्या दरा नुसार गॅस सिलेंडर मिळण्याबाबत श्री.मच्छिंद्र त्र्यंबक मंडलिक, अध्यक्ष ग्राहक पंचायत अकोले व इतर ७ यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर येथे तक्रार अर्ज सादर केलेला आहे.

(२), (३) व (४) होय, याबाबत चौकशी केली आहे. त्याअनुषंगाने तहसिलदार, अकोले यांनी गॅस एजन्सीचे सेल्स ऑफीसर यांच्या कडून सविस्तर अहवाल प्राप्त करुन घेतला. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या दिनांक २९/१०/२०१३ च्या आदेशानुसार योग्यती कार्यवाही करण्यात आलेली असल्याचे चौकशीत आढळून आल्यामुळे संबंधित गॅस वितरक यांचे विरुध्द कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे (जि.पुणे) विभागातील ४१५ वाड्यांमधील १ लाख ६७ हजार नागरीकांना टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याबाबत

**(२१) ३०३६२ (२१-१२-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) विभागातील ४१५ वाड्यांमधील १ लाख ६७ हजार नागरीकांना अजूनही टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पाणी टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२३-०२-२०१६) :** (१) होय, पुणे विभागात माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये ७२ गावे, ४१५ वाड्यांतील १६७८५८ लोकसंख्येला ७५ टँकरने पाणी पुरवठा केला जात होता.
(२) पुणे विभागात एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत एकूण २५८ गावे व ८३६ वाड्यांसाठी ६७० उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात घरगुती गॅस सिलेंडरच्या स्फोटाच्या घटनांमध्ये झालेली वाढ**

**(२२) ३०४५८ (२१-१२-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत तीन वर्षामध्ये घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा स्फोट होण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, एकूण ६२ घटनांमध्ये २० जणांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल ते माहे जुलै, २०१५ या चार महिन्यांच्या कालावधीत झालेल्या १० घटनांमध्ये ५ व्यक्ती मरण पावल्या असून ७ व्यक्ती जखमी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गॅस वितरकांनी आपल्या परिसरातील एलपीजी गॅस सिलेंडरर्सची दोन वर्षातून एकदा सक्तीने तपासणी करण्याचे आदेश दिले असतानाही गॅस वितरक तपासणी करत नसल्यामुळे गॅस सिलेंडरच्या अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने निष्कळाजीपणा करणाऱ्या किती गॅस वितरकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) गॅस वितरकांनी आपल्या परिसरातील एलपीजी गॅस सिडलेंडर्सची दोन वर्षातून एका सक्तीने तपासणी करण्याबाबतचे निदेश आहेत, त्यानुषंगाने गॅस वितरकांचे कर्मचारी सदरील तपासणी करतात. तथापि, सदरील तपासणीसाठी शूल्क आकारले जात असल्याने ग्राहक तपासणी करुन घेण्यास अनुत्सूक असतात. त्यामुळे वितरकांनी तपासणी न केल्यामुळे सदरील गॅस सिलेंडरचा स्फोट होतो ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

---

**ठाणे जिल्ह्यात जिल्हा पुरवठा विभागाकडून धान्य पुरवठा सुरळीत करण्याबाबत**

**(२३) ३११२८ (२१-१२-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड**

**पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात जिल्हा पुरवठा विभाग शासनाकडून मिळणारे धान्याचे नियतन वेळेत वाटप केले जात असले तरी शहरासह जिल्ह्यातील शिधावाटप दुकानात गहू तांदूळ रॉकेलसह साखरेचे शहरात २०-२५ आणि ग्रामीण भागात ५-१० टक्के धान्यपुरवठा अपुरा होत असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील धान्य पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०२-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये रास्तभाव दुकानदारांचा भारतीय अन्न महामंडळाच्या हमालांचा संप तसेच, भारतीय अन्न महामंडळाच्या भिवंडी येथील डेपोमध्ये अन्नधान्याचा साठा उपलब्ध नसल्याने ठाणे जिल्ह्याची प्राधान्य कुटुंब योजनेच्या तांदूळाची उचल ९० टक्के झाली आहे. परंतु, अंत्योदय अन्न योजनेचा गहू व तांदूळ, प्राधान्य कुटुंब योजनेचा गहू तसेच, साखर व केरोसीनचे वाटप मंजूर नियतनाप्रमाणे करण्यात आले आहे.

(२) व (३) अन्नधान्याचा पुरवठ पुरेसा होण्याच्या दृष्टीने शिल्लक अन्नधान्यातून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्याकरिता देण्यात आलेल्या अन्नधान्याची उचल पूर्ण होण्याच्या दृष्टीने सहकार्य करण्याबाबत व पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याबाबत भारतीय अन्न महामंडळास शासन स्तरावर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

### राज्यात बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या कामात अनियमितता झाली असल्याबाबत

**(२४) ३११७२ (०८-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे गत एक वर्षाच्या कालावधीत कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या कामात अनियमितता झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच या शौचालयाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार/अनियमितता यांची तपासणी करण्याचा निर्णय महालेखापाल कार्यालयाने (कॅग) घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तपासणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शिधापत्रिकेमध्ये नागरिकांच्या उत्पन्नाच्या निकषामध्ये बदल करण्याच्या मागणीबाबत**

**(२५) ३१६२६ (२१-१२-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिधापत्रिकेमध्ये नागरिकांच्या उत्पन्नाच्या निकषामध्ये बदल करावेत यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) तसेच सुधारित निकष अंमलात आणून गरजु आणि वंचित शिधापत्रिकाधारकांना शासन योजनेत समाविष्ट करुन घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०२-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) उत्पनाची मर्यादा वाढविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये मागणी केलेली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३ राज्यामध्ये दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पासून लागू करण्यात आला असून या अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी निवडी करीता कुटुंबाची एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण भागासाठी रु. ४४०००/- व शहरी भागासाठी रु. ५९०००/- इतकी दि. १७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. हे निकष व राज्यास मंजूर केलेल्या विहीत इष्टांकानुसार ७.०१६ कोटी जनतेस सदरहू योजनेअंतर्गत लाभ देण्यात येत आहेत.

सद्य:स्थितीत सदरहू शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या उत्पन्नाच्या निकषांमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शसनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील चार जिल्ह्यांमध्ये वायू प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियमाचे उल्लंघन करण्यात येत असल्याबाबत**

**(२६) ३१९८५ (२१-१२-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील केवळ चार जिल्ह्यांचाच समावेश असल्याने वायू प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियमाचे उल्लंघन करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वायूप्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर दूरगामी परिणाम होतात, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उद्योग आणि वाहनांमधून उत्सर्जित होणा-या दूषित वायूची वेळोवेळी तपासणी होणे आवश्यक असतांनाही एकाही जिल्ह्यात यासंबंधीची कुठलीच यंत्रणा कार्यान्वित नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

तथपि, वाहनांमधून उत्सर्जित होणाऱ्या दुषित वायुची नियमित तपासणी परिवहन विभागामार्फत करण्यात येते.

NAMP या केंद्रशासनातर्फे पुरस्कृत योजनेंतर्गत व्हिएन आयटी या शैक्षणिक संस्थेमार्फत नागपूर शहरामध्ये १) तंत्रनिकेतन संस्था सदर, नागपूर २) इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअर्स नॉर्थ अंबाझरी, नागपूर व ३) उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे वातावरणीय हवेची गुणवत्ता नियमितपणे तपासण्यात येते.

चंद्रपूर जिल्ह्यात NAMP/SAMP अंतर्गत प्रशासकीय इमारत चंद्रपूर, ग्रामपंचायत घुग्घुस, एमआयडीसी, चंद्रपूर, बल्लारपूर, ताडाली , ग्रामपंचायत गडचांदूर या सहा ठिकाणी हवेच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येते. तसेच उद्योग भवन, चंद्रपूर या ठिकाणी नियमित हवा गुणवत्ता तपासणी केंद्र (Continuous Ambient Air Quality Monitoring sation) नुकतेच कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये वजन-काटे विभागामध्ये रिक्त असलेली अनेक पदे व विभागाच्या आधुनिकीकरणाबाबत**

**(२७) ३२२२२ (२१-१२-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये वजन-काटे विभागामध्ये अनेक पदे रिक्त आहेत व वजने तपासण्यासाठी

कोणत्याही प्रकारची अत्याधुनिक यंत्रणा नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागासाठी नवीन सहा गाड्या घेतल्या आहेत परंतु त्या इंधनाविना पडून आहेत व अधिका-यांना तपासणीच्या कामासाठी गाड्यादेखील उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर विभागाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून मिळणारा निधी विभागापर्यंत काही जाचक अटींमुळे मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विभागाच्या आधुनिकीकरणाबाबत व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०८-०३-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
वैध मापन शास्त्र यंत्रणेतील एकूण ९४५ पदांपैकी ८७ पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत व यंत्रणेतील निरीक्षकांना मानक उपकरणांच्या संचाचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
यंत्रणेतील क्षेत्रिय अधिकाऱ्यांसाठी नवीन सहा गाड्या खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
प्रयोगशाळा उभारण्यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त रु. ५.४९ कोटी इतक्या निधीपैकी आतापर्यंत रु. ४.७७ कोटी इतका निधी वैध मापन शास्त्र यंत्रणेस उपलब्ध करुन देण्यात आला असून उर्वरित ०.७२ कोटी इतका निधी शासकीय जागा उपलब्ध न झाल्यामुळे वितरीत करण्यात आलेला नसून शासकीय जागा उपलब्ध झाल्यास निधी उपलब्ध नियमानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. यंत्रणेच्या आधुनिकीकरणाच्या संदर्भात शासकीय जागा मिळवून त्यावर प्रयोगशाळा उभारण्याबाबत तसेच यंत्रणेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर लॅपटॉप व प्रिंटर्स पुरविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच रिक्त पदांपैकी सरळसेवेने व पदोन्नतीने पदे भरण्याबाबत प्रचलित आदेशानुसार कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील काही गावात रॉकेल व स्वस्त धान्याचे परवाने नसल्याने नागरिकांची होत असलेली गैरसोय

**(२८) ३३०३९ (२१-१२-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील १९१ गावांपैकी ५० गावात रॉकेल परवाने नसून ४७ गावात स्वस्त धान्याचे परवाने नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त तालुक्यातील सर्वच गावांना स्वस्त धान्य दुकान परवाने व रॉकेल परवाने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१६) :**(१) अकोले, जि.अहमदनगर येथील काही गावात केरोसिन परवाने व स्वस्त धान्य दुकान परवाने नाहीत, हे खरे आहे.

तथापि, नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) केरोसिन परवाने व स्वस्त धान्य दुकान परवाने देण्यासाठी जाहिरनामे काढून पात्र बचत गटांना परवाने देण्यात आले आहेत. बचत गटांकडून अर्ज प्राप्त न झालेल्या गावात परवाने देण्यात आले नसून लगतच्या परवानाधारकास त्या गावाच्या शिधापत्रिका जोडण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्याचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित असल्याबाबत

**(२९) ३३१२४ (२१-१२-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात पाणी टंचाई निर्माण झाल्याने शासनाने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे सर्व अधिकार तहसिलदार यांना दिले आहेत मात्र टँकर सुरु करण्याचे प्रस्ताव तहसिलदार त्यांच्याकडे पाठविण्यात येत नसून ते जिल्हाधिकारी कार्यालयातच प्रलंबित असल्याने पाण्याचे टँकर सुरु करण्यात येत नसल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच वडांगळी (नाशिक) परिसरात अपुरा पाऊस झाल्याने परिसरातील नद्या, नाले व विहिरी तील पाणी आटले असल्याने उक्त ठिकाणी दोन दिवसाआड पाणी पुरवठा केला जात असल्याने नागरिकांना पाण्यासाठी शोधाशोध करावी लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रस्ताव त्वरित पाठविण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.

शासन निर्णय ३१.०१.२०१५ अन्वये ज्या तालुक्यातील गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आहे अशा गावांना टंचाई परिस्थितीत टँकरने पाणी पुरवठा करणेचे अधिकार तहसिलदार यांना विहित कालावधीसाठी प्रदान करण्यासाठी विभागीय आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त, नाशिक यांचे आदेश दि.१८.२.२०१५ अन्वये नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या ११ तालुक्यातील १३४६ गावांना आवश्यकतेनुसार टँकर सुरु करण्याचे अधिकार तहसिलदार यांना दि. ३०.०६.२०१५ पर्यंत प्रदान करण्यात आले होते.

तथापि टँकरचे अधिकार सद्यःस्थितीत जिल्हाधिकारी यांना आहेत.

(२) व (३) नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील वडांगळी परिसरात अपुरा पाऊस झाल्याने परिसरातील नद्या नाले कोरडे पडले हे खरे आहे. तसेच विहिरींच्या पाणी पातळीत सुध्दा काही अंशतः प्रमाणात घट झाली आहे. दि.११.०८.२०१५ रोजी ग्रामपंचायतीने टँकर मागणीचा प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर केला होता. त्यानुसार तहसिलदार, गट विकास अधिकारी, उप अभियंता, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे यांनी गावास समक्ष भेट देवून पाहणी केली होती.

(४) टँकर मागणी अर्जानुसार तहसिलदार व इतर अधिकारी यांनी पाहणी केल्यानुसार गावालगतच्या २-३ खाजगी विहिरींना कमी अधिक प्रमाणात पाणी आढळले, त्यानुसार तहसिलदार यांच्या दि.२६.०८.२०१५ चे आदेशानुसार खाजगी विहीर अधिग्रहित करण्यात आली होती. पाण्याच्या उपलब्धतेनुसार गावात ०२ दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे.

तसेच वडांगळी हे गाव वडांगळी सह १४ गावे या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट असून सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेची चाचणी सुरु असून दि. ०४.१२.२०१५ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत या योजनेतून नियमित पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लाल नाईक तांडा (जि.परभणी) येथे गढूळ व अशुध्द पाणी टँकरद्वारे पुरवठा केल्याप्रकरणी कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत

**(३०) ३३६०२ (२१-१२-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाल नाईक तांडा (जि.परभणी) येथे गढूळ व अशुध्द पाणी टँकरद्वारे पुरवठा

केल्याप्रकरणी कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी यांनी दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशानुसार संबंधित कंत्राटदारांवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला वा कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२३-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) श्री. गणेश पांडूरंग सुरवसे, रा. सिंगणापूर ता. परभणी व श्री. अमोल गजानन जाधव, रा. ब्रम्हपूरी ता पाथरी जि. परभणी यांचेवर दिनांक १२ सप्टेंबर, २०१५ रोजी पोलिस स्टेशन देठणा येथे क्रि.प्रो. कोड कलम १४९ तसेच भा.द.वि. कलम २७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आळते, तिळवणी, मजले (ता.हातकंणगले, जि.कोल्हापुर) या तीन गावांना होणारा दूषित पाणी पुरवठा**

**(३१) ३४१९० (२१-१२-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आळते, तिळवणी, मजले (ता.हातकंणगले, जि.कोल्हापुर) या तीन गावांना माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दूषित पाण्यामुळे साथीचे रोग पसरण्याची व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची तक्रार संबधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रार करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर गावांना शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०२-२०१६) :** (१), (२),(३) व (४)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदर गावांमध्ये सदर कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारच्या जलजन्य साथीचा उद्रेक झालेला नाही.

---

**कुंभोज (ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३२) ३४१९५ (२१-१२-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभोज (ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेची कामे एक वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्याप काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम अपूर्ण अवस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर काम पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०२-२०१६) :** (१) होय.

सदर योजनेच्या जॅकवेल दुरुस्तीचे १०० % काम पुर्ण असून जलशुध्दीकरण केंद्राचे ७० % व वितरण व्यवस्थेचे ८० % काम पुर्ण झाले आहे. सद्यःस्थितीत गावास वितरण व्यवस्थेतून पाणीपुरवठा सुरु आहे.

(२) व (३) सदर योजनेस दि. २९.०३.२०१४ रोजी पहिला हफ्ता (रु.६५.९८ लक्ष) व दि.२६.११.२०१५ रोजी दुसरा हफ्ता (रु.७०.६२ लक्ष) देण्यात आला आहे. सदर योजनेच्या कामास ग्रामसभेने दि.३१.०३.२०१६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. निधी उपलब्धेनुसार योजनेतील उर्वरित कामे पुर्ण करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील हॉटेल, किराणा दुकान व वाईन बार येथे मुदतबाह्य पॅकिंग खाद्यपदार्थाची होत असलेली विक्री**

**(३३) ३४२८६ (२१-१२-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील हॉटेल, किराणा दुकान व वाईन बार येथे मुदतबाह्य पॅकिंग खाद्यपदार्थाची विक्री होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदखेडराजा शहरासह दुसरबीड, किनगावराजा, सोनुशी, मलकापूर, पांग्रा, शेंदुर्जन, साखरखेर्डा, राहेरी यासह खेड्यापाड्यातील किराणा दुकानांमध्ये चिवडा, मुग डाळ यासह अनेक खाद्यपदार्थ पॅकिंगमध्ये विक्रीला ठेवण्यात येत असून त्या पाकिटावरील मुदतही संपलेली असतांनाही खाद्यपदार्थाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) तालुक्यातील हॉटेल, किराणा दुकान व वाईन बार येथे मुदतबाहय पॅकींग खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य मिळाले नसल्याबाबत

**(३४) ३४३३० (२१-१२-२०१५). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना माहे ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याचे धान्य मिळाले नसल्याने शिधापत्रिका धारकांना त्यांच्या हक्काच्या धान्यापासून वंचित राहावे लागल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न धान्याची वाहतुक करणाऱ्या ठेकेदाराने अन्नधान्य महामंडळाकडून शासकीय गोदामापर्यंत धान्याची उचल करुन धान्य न पोहचविल्यामुळे हजारो मेट्रीक टन धान्य व्यपगत झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन महिन्याचे व्यपगत झालेले धान्य सदर जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदर धान्य व्यपगत झाल्याने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) नाशिक रोड व अंबड येथील अन्नधान्य वाहतूक ठेकेदाराचा ठेका दि. ६ फेब्रुवारी, २०१५ पासून रद्द करण्यात आला आहे, तर मनमाड येथील वाहतूकदाराने या वाहतूक दरात काम करण्यास असहमती दर्शवून काम बंद केले. तेव्हापासून नाशिक जिल्ह्यामध्ये अधिग्रहित वाहनांद्वारे अन्नधान्य वाहतूक करण्यात येत आहे.

नाशिक येथे कुंभमेळा सुरु असल्याने ऑगस्ट, २०१५ मध्ये नाशिक रोड येथील भारतीय अन्न महामंडळाचा डेपो बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे अन्नधान्य उचलीस काही प्रमाणात विलंब झालेला असला तरीही माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये एकूण नियतनापैकी ८३ टक्के उचल पूर्ण करण्यात आली असून माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये ९८ टक्के उचल पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे हजारो मेट्रीक टन धान्य व्यपगत झाले हे खरे नाही.

(३) ऑगस्ट, २०१५ मध्ये धान्य पुरवठा करावयाच्या राहिलेल्या ११७ पैकी ११३ शिधावाटप दुकानांना परमीट मुदतवाढ देऊन सप्टेंबर, २०१५ मध्ये धान्य उपलब्ध करुन देण्यात आले तर माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये धान्य पुरवठा करावयाच्या राहिलेल्या १२७ पैकी १२३ दुकानांना परमीट मुदतवाढ देऊन माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये धान्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यात दूषित पाणी प्रक्रिया न करता नद्यांमध्ये सोडणा-या कारखाने व उद्योगधंद्यावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश**

**(३५) ३४४५८ (२१-१२-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात दूषित पाणी प्रक्रिया न करता नद्यांमध्ये सोडणा-या कारखाने व उद्योगधंद्यावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत किती कारखाने व उद्योगधंद्यांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) तसेच उर्वरित कारखान्यांविरुध्द कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उप-प्रादेशिक अधिकारी, अहमदनगर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणा-या १४ कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून १४ कारखान्यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे एकूण ३१ कारखान्यांना प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले असून दोन कारखान्यांना बंदीचे आदेश बजावण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे वेळोवेळी कारखान्यांच्या बँक हमी जप्त करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी प्रस्तावित केलेल्या कृति आराखड्याबाबत**

**(३६) ३४६९७ (२१-१२-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात सन २०१४-१५ या कालावधीत पाणी टंचाई निवारणासाठी तब्बल रुपये ३७ कोटी ५० लाखांचा कृति आराखडा प्रस्तावित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात दिनांक १ ऑक्टोबर, २०१४ ते माहे सप्टेंबर, २०१५ अखेर पर्यन्त २०,०२,९५,०००/- रुपये एवढा खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणासाठी जिल्हा प्रशासनाला आतापर्यंत ८,७३,४५,०००/- रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्यापही ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणासाठी ११,२९,५०,०००/- रुपये आवश्यक आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त आवश्यक असलेला निधी तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यापैकी माहे नोव्हेंबर, २०१५ अखेरपर्यन्त किती निधी दिला आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) ग्रामीण पाणी टंचाई २०१४-१५ निवारणासाठी जिल्हा परिषदेला आजतागायत रु.१८४८.५६ लक्ष निधी प्रदान करण्यात आला आहे. सद्यःस्थितीत रु. १५४.३९ लक्ष निधी मागणी प्रलंबित आहे. सदर निधी जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने निधीची मागणी महसूल विभागास करण्यात येत आहे.

---

### कोल्हापूर महानगरपालिकेने प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना न केल्याबाबत

**(३७) ३५२२२ (२१-१२-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबईतील वरिष्ठ कार्यालयाकडे प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना न केल्याने व सांडपाणी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पातील वायूगळती प्रकरणी कोल्हापूर महानगरपालिकेची वीज तोडावी असा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
मात्र महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक ३०.०७.२०१५ च्या पत्रान्वये अशा घटनांची भविष्यात पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेला उपाययोजनांबाबत कळविले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीमधील अनधिकृतपणे अतिक्रमण करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करणेबाबत**

**(३८) ३५६३५ (२१-१२-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीमध्ये अतिक्रमण करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, मा. पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी, ठाणे, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर, आयुक्त, उल्हासनगर महानगर पालिका यांच्याकडे दिनांक २२ ऑगस्ट,२०१५ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पर्यावरण मंत्री यांनी पावसाळी अधिवेशन, २०१५ मधील तारांकित प्रश्न क्र १८९९५ ला उत्तर देताना सदरची बांधकामे निष्कासित करावी असा आदेश असतानाही सदर विभागाकडून अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्हा समितीच्या दिनांक १९ मे, २०१४ व दिनांक २५ जुलै, २०१४ रोजीच्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केली होती परंतु अद्यापही सदर विभागाकडून कोणत्या प्रकारची कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, उल्हास आणि वालधुनी नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी तसेच वेगवेगळ्या महापालिका आणि पालिकांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या प्रश्नांवरील तोडग्यासाठी आराखडा तयार करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने दि.१३ ऑगस्ट २०१५ रोजी नगरविकास विभागाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी व या समितीने दिनांक १५ ऑक्टोबर २०१५ अखेरपर्यंत आपला अहवाल द्यावा, असे स्पष्ट आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर व त्याला संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील अहवाल तयार करण्यात आला आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पोलीस बंदोबस्तात नदीपात्रातील अतिक्रमण धारकांवर दिनांक ०८.०१.२०१५ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेकडून निष्कासित कार्यवाही करण्यात आली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात वालधुनी नदीलगत असलेले अतिक्रमण हे जुने आहे. तसेच नदीपात्रामध्ये नवीन अतिक्रमण आढळून आल्यास त्यांचेवर उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे नियमानुसार निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

उल्हासनगर महापालिका क्षेत्रामधील नदीपात्रामध्ये कोणतेही नवीन अनधिकृत बांधकाम आढळून आले नाही, तथापि पोलिस बंदोबस्तात नदीपात्रामधील अतिक्रमण धारकांवर दिनांक ८/१/२०१५ रोजी निष्कासनाची कार्यवाही करण्यात आल्याबाबत कळविले आहे.

(४) हे खरे आहे.

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र. याचिका/२०१३/प्र.क्र.१६२/तां.क.१ दि. १५.०६.२०१५ अन्वये न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी मा.मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) शहरामध्ये होणारे प्रदूषण**

**(३९) ३५८४७ (२१-१२-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहराची लोकसंख्याची घनता सर्वाधिक असून अति प्रदूषित हवा, पाणी तर ९० टक्के सांडपाणी उघड्या नाल्यात सोडणे आदी समस्यांमुळे शहराचे नियोजन कोलमडणार असल्याचा इशारा पर्यावरण अहवालात दिला असून विकास न झाल्याने शहर राहण्यास अयोग्य असल्याची टीका तज्ञाकडून होत असल्याचे माहे दि. २३ सप्टेंबर,२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडून रस्ते पाणी, कचरा नाले रस्ते बांधणी आरोग्य आदि नागरिकांना मुलभूत सुख सुविधा मिळत नसल्याने महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर टीका होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही, तथापि स्थानिक दैनिक वृतपत्रात सदर आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(३) होय,

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा सुधारणा होण्याकरीता उल्हासनगर महानगरपालिका मार्फत जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेतंर्गत सुधारीत पाणी पुरवठा योजना केंद्र/राज्य शासनाकडून सदर योजना राबविण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे खेमाणी नाल्यातील सांडपाण्याची विल्हेवाट करण्याच्या दृष्टीने रु. ३२.०० कोटी ची मल:निसारण योजना राबविण्याच्या दृष्टीने निविदाकराची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या अमृत अभियानातंर्गत संपुर्ण शहरातील मल:निसारण

योजना रु. ४१० कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. तो प्रकल्प राज्य वार्षिक कृती आराखडा समितीने (State Annual Action Plan) केंद्र शासनास सादर केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियांनाअंतर्गत काम करणारे**
**कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(४०) ३५९४७ (२१-१२-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियांनातंर्गत काम करणारे कंत्राटी कर्मचारी आपल्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन करीत असल्याने सदर जिल्ह्यात स्वच्छतेची कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) गटसंसाधन केंद्रातील कंत्राटी कर्मचा-यांनी केलेल्या आंदोलनाच्या कालावधीत सांगली जिल्ह्यातील स्वच्छतेची कामे जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष (DWSM) या मधील कंत्राटी कर्मचारी, तालुकास्तरावरील गट समन्वयक व ग्रामसेवकामार्फत पुर्ण करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदी लगत संभाव्य ठिकाणी**
**सी सी टी व्ही बसविण्याबाबत**

**(४१) ३६५६४ (२१-१२-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदी पात्रात टँकर माफियांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास घातक रसायन टाकल्यामुळे ७८८ नागरिकांना त्रास होऊन उल्हासनगरच्या विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून दि. १ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठक घेऊन संभाव्य ठिकाणी एन्फ्रारेड सी सी टी व्ही कॅमेरे बसवून दैनंदिन डाटा राखण्याची जबाबदारी पोलीस विभागावर सोपविलेली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित पोलीस स्टेशनने संभाव्य ठिकाणी एन्फ्रारेड सी सी टीव्ही कॅमेरा बसविले आहेत काय व त्याचा दैनंदिन डाटा सुरक्षित ठेवला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४ उल्हासनगर यांनी दि. २३.०१.२०१५ रोजी, सीसीटिव्ही बसविण्याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेला सुचित केले आहे.

आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक ०७.१२.२०१५ रोजी सीसीटिव्ही बसविण्याबाबत पोलीस विभाग व महानगरपालिका यांच्यातर्फे संभाव्य ठिकाणी पाहणी करुन, तांत्रिक बाबी असल्याने सल्लागार नियुक्त करुन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी येणारा वित्तीय खर्च निश्चित करुन ई-निविदा काढण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोरे मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही चालू असल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वणी (जि.यवतमाळ) तालुकयातील निर्गुडा व विदर्भा नद्यांचे झालेले प्रदुषण

**(४२) ३६८६६ (२१-१२-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील निर्गुडा व विदर्भा या दोन्ही महत्वाच्या नद्या असून निर्गुडा ही वणी शहराला पिण्याचे पाणी पुरवठा करणारी नदी असतानाही लालपुलीयातील कोळसा डेपोच्या होणा-या प्रदूषणाचे पाणी नदी पात्रात जात असल्याने नदीचे पाणी प्रदुषित झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भविष्यात वणी शहराला पाणी संकटाचा मोठा सामना करावा लागणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू कोळसा डेपोतील प्रदूषणाचे पाणी नदीपात्रात न सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) दि.११.०१.२०१६ रोजी उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चंदपूर यांच्यातर्फे चौकशी करण्यात आलेली आहे. त्यात कोल डेपोतून नदी पात्रात पाणी सोडताना आढळले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेर्डी गाव (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील कचरा प्रकल्पात झालेला गैरव्यवहार**

**(४३) ३७०७० (२१-१२-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेर्डी गाव (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे २५ लाख रुपयांचा तयार करण्यात आलेला कचरा प्रकल्प खेर्डी ग्रामपंचायतीने रद्द करुन गावातील कचरा वशिष्ठि नदीपात्रालगत टाकण्यात येत असल्याने खेर्डी बरोबर चिपळूण शहरवासियांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याने सदर कचरा प्रकल्पात गैरव्यवहार करणा-या खेर्डी ग्रामपंचायतींची चौकशी करण्याची मागणी मा.पर्यावरण मंत्री यांच्याकडे दिनांक ८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास युवा सेनेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(३) तसेच सदर कचरा प्रकल्प तातडीने सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) अशा प्रकारची मागणी केल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीअंती सदर ग्रामपंचायत नागरी घनकचऱ्याची विल्हेवाट वशिष्ठी नदीपासून अंदाजे १०० फुट अंतरावरील स्वत:च्या मालकीच्या जागेत करत असल्याचे आढळून आले. तसेच घरगुती कचऱ्यांपासून वर्गीकृत केलेला प्लास्टिक कचऱ्यांची विल्हेवाट २०X२० फुट आकाराच्या खड्ड्यात करताना आढळले. उर्वरित ओला कचरा प्रक्रियेसाठी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या वशिष्ठी नदीपासून अंदाजे ५ कि.मी. अंतरावरील स.नं. १४३ येथे गांडुळ खत प्रकल्पास पाठविण्यात येतो. पाहणीअंती सदर प्रकल्प चालू असल्याचे आढळले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील अत्यल्प उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांना अपुरा धान्यपुरवठा करण्यात आल्याबाबत**

**(४४) ३७९९३ (२१-१२-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील गरीब व अत्यल्प उत्पन्न असलेल्या लाभार्थी कुटुंबियांना माहे सप्टेंबर, २०१५ पासून अपुरा धान्यपुरवठा करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जिल्ह्यामध्ये पुरेसा धान्यपुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-०२-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.
(२) चौकशीअंती भारतीय अन्न महामंडळाच्या भिवंडी येथील डेपोमध्ये अन्नधान्याचा साठा कमी प्रमाणात असल्याचे व त्यामुळे पालघर जिल्ह्याची अन्नधान्याची उचल काही प्रमाणात कमी झाली असल्याचे आढळून आले.
(३) व (४) अन्नधान्याचा पुरवठा पुरेसा होण्याच्या दृष्टीने शिल्लक अन्नधान्यातून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्याकरीता देण्यात आलेल्या अन्नधान्याची उचल पुर्ण होण्याच्या दृष्टीने सहकार्य करण्याबाबत व पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याबाबत भारतीय अन्न महामंडळास शासन स्तरावर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**कल्याण-डोंबिवली शहरातील नदी, नाले, खाडीच्या प्रदुषणाची पातळी वाढल्याने औद्योगिक कंपन्या बंद करण्याबाबत**

**(४५) ३८०३७ (२१-१२-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली शहरातील नदी, नाले, खाडीच्या प्रदुषणाची पातळी कमालीची वाढल्याने शहरातील ४० औद्योगिक कंपन्या बंद करण्याची वेळ महापालिकेवर आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही शहरांनी जलप्रदूषणाची कमाल मर्यादाही ओलांडल्या असल्याचे महापालिकेच्या पर्यावरण अहवालातून स्पष्ट झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) मा. हरीत लवाद पुणे, यांनी मे. वनशक्ती यांनी दाखल केलेल्या प्रकरण क्र. ३७/२०१३ मध्ये निर्देशीत केल्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून समितीद्वारे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतून घरगुती सांडपाण्यावर व औदयोगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल (७२०८/२०१५) या याचिकेच्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने दि. १३.०८.२०१५ रोजी अंतरिम आदेश काढून महाराष्ट्र शासनास निर्देश दिलेले आहेत त्याची पूर्तता करण्याकरिता शासनाने, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केलेली आहे. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी या संबंधीत ८ ऑक्टोबर, २०१५ रोजी बैठक घेऊन निर्देश दिलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे गुजरात मधून भेसळयुक्त मावा आला असल्याबाबत**

**(४६) ३८०४२ (२१-१२-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे गुजरात मधून भेसळयुक्त मावा आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार भेसळयुक्त माव्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्पपरिणाम होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (१०-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) (३) व (४)

प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य ग्राहक आयोग, मुंबई येथील कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४७) ३८०८३ (२१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य ग्राहक आयोगाचे मुंबई येथील कार्यालय ३,००० चौ.फूट जागेत असून त्यापैकी अध्यक्षांची कोर्ट रुम अवघ्या २५० चौ.फूट जागेत, तर दुसरे न्यायालय अवघ्या १०० चौ.फूट जागेत कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आयोगातील कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी असून कर्मचारी व वकीलांसाठी प्रसाधनगृह व पिण्याच्या पाण्याची सोयही नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य ग्राहक आयोगाचे मुंबई येथील कार्यालयात तातडीने अत्याधुनिक सुविधांसह, मंजुर कर्मचारी वर्ग भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०२-२०१६) :**(१) राज्य ग्राहक आयोग, मुंबई येथील कार्यालयास ६००० चौ.फूट जागा उपलब्ध असून ३००० चौ. फूट जागा वापरण्याजोगी आहे. त्यापैकी अध्यक्षांची कोर्ट रुम २५० चौ, फुट जागेत, तर दुसरे न्यायालय १०० चौ.फूट जागेत कार्यरत आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २२.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार व मा.उच्च न्यायालयाच्या दि. २७.१०.२०१५ च्या आदेशानुसार जुने सचिवालय, विस्तार इमारत, तळ मजला येथील ५००५ चौ. फूट जागा राज्य आयोगास सध्या कार्यरत असलेल्या जागेव्यतिरिक्त उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(२) राज्य आयोगातील कर्मचाऱ्यांसाठी प्रसाधनगृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. वकीलांसाठी प्रसाधनगृहाची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) ग्राहक संरक्षण यंत्रणेतील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दि. २४.०९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांना विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्य आयोगातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे पदोन्नतीने तसेच सरळसेवेने भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील नऱ्हे, वडगाव धायरी, वारजे, शिवणे, उत्तमनगर औद्योगिक वसाहतीमधून होणारे प्रदूषण

**(४८) ३८३४६ (२१-१२-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील नऱ्हे, वडगाव धायरी, वारजे, शिवणे, उत्तमनगर औद्योगिक वसाहतीतील रसायनयुक्त पाणी सभोवतालच्या रहिवाशी वस्तीमध्ये सोडले जात असल्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी कंपन्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आष्टी (जि. बीड) तालुक्यातील गावांसाठी सिना धरणातून प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(४९) ३८७६३ (२१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि. बीड) तालुक्यातील सुमारे ६५ गावे आणि वाडयांचा पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी सिना धरणातून प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आष्टी व स्थानिक ग्रामस्थ शासनाकडे सातत्याने करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२३-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आष्टी व ६४ गावे (ता.आष्टी जि.बीड) या प्रादेशिक योजनेतील सर्व गावासाठी सिना धरणातून योजना आखणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांनी रु. १२८ कोटी ढोबळ किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले असून योजनेच्या प्राकलन, आराखडे व सर्वेक्षणासाठी रु. ६३ लक्ष रकमेची मागणी जिल्हा परिषद बीड यांचेकडून केली आहे.

तथापि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना असून योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार करण्यात येते. केंद्र शासनाच्या दि. २९.७.२०१५ च्या पत्रान्वये अ) ज्या योजनांना दि.२९.६.२०१५ पूर्वी कार्यादेश दिलेले आहेत. तसेच ज्या योजना प्रत्यक्षात प्रगतीपथावर आहेत अशाच योजनांवर निधी खर्च करण्यात येणेबाबत. ब) ज्या योजनांना राज्यस्तरीय योजना समितीने (SLSSC) मान्यता दिलेली आहे. परंतु सदर योजना नियोजन टप्पा/निविदा प्रक्रियेत आहेत अशा योजनांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येवू नये. असे निर्देश देण्यात आले आहेत. तूर्तास केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत दिनांक १४.८.२०१५ च्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिरुर (जि.बीड ) तालुक्यातील गावांना जायकवाडी धरणातून प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा करण्याबाबत

**(५०) ३८८०९ (२१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.बीड) तालुक्यातील सुमारे ३०-४० गावांची पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी जायकवाडी धरणातून भगवंतगडावर पाणी नेऊन प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करुन सदरहू गावांना पाणी पुरवठा करण्याची मागणी. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सदरहू गावांसाठी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शिरुर (जि.बीड) तालुक्यातील गावांना जायकवाडी धरणातून प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कार्यान्वनासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांचेकडून योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना असून योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार करण्यात येते. केंद्र शासनाच्या दि. २९.७.२०१५ च्या पत्रान्वये अ) ज्या योजनांना दि. २९.६.२०१५ पूर्वी कार्यादेश दिलेले आहेत. तसेच ज्या योजना प्रत्यक्षात प्रगतीपथावर आहेत अशाच योजनांवर निधी खर्च करण्यात येणेबाबत. ब) ज्या योजनांना राज्यस्तरीय योजना समितीने (SLSSC) मान्यता दिलेली आहे, परंतु सदर योजना नियोजन टप्पा/निविदा प्रक्रियेत आहेत अशा योजनांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येवू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. तूर्तास केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत दिनांक १४.८.२०१५ च्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**<br>**प्रधान सचिव**<br>**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.